ISSN 2231-3249

# New Voices

## Multilingual International Pear Reviewed Journal of Multidisciplinary Studies

Volume - X Issue II October 2023

Editor-in-chief
Dr. Shaikh Parvez Aslam

Associate Editor
Jitendra Shejwal

Scanned with OKEN Scanner

# Content


शिक्षण प्रक्रिया : भारतीय भाषा, संस्कृती आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०
प्रा. डॉ. गजानन पांडुरंग जाधव 1

नवीन शैक्षणिक धोरण-२०२०: स्वरुप, अंमलबजावणी आणि आव्हाने
डॉ. भगवान सुरेश भनाळ 5

राष्ट्रीय शिक्षा नीति और हिन्दी
डॉ. मिर्झा अनिस बेग रज्जाक बेग 9

अंतरात्मा की मार्मिक नाट्याभिव्यक्तिः इन्ना की आवाज़
प्रा. असद खान हमीद खान 13

नई शिक्षा नीति और समस्याएं और चुनौतियां
अश्विनी सुनिल अंभोरे 16

राष्ट्रीय शैक्षणीक धोरण २०२० समस्या आणि आव्हाने
अश्विनी दिलीप डोळस 20

रानसय' ललित लेखसंग्रहातील वाङ्मयीन भाषा विशेष
डॉ. नारायण शिवशेट्टे 23

सुनीता जैन की कविताओं में पर्यावरण विमर्श
प्रा. जे. एस. पाटील 27

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० -एक अभ्यास
प्रा. डॉ. सय्यद मुजीब मुसा 31

'राष्ट्रीय शिक्षा नीति २०२० और भारतीय भाषाएं'
प्रा.डॉ. शेख मुखत्यार शेख वहाब 34

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०:आव्हाने आणि प्रश्न
प्रा.डॉ. काशीद सीमा विजयराव 38

उदय प्रकाश की कहानियों में कथ्य की नवीनता
डॉ. प्रकाश भगवानराव शिंदे 41

नवीन शैक्षणिक धोरण आणि भाषा
प्रा.डॉ. संतोष देशमुख 45


Scanned with OKEN Scanner

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०:आव्हाने आणि प्रश्न

प्रा.डॉ. काशीद सीमा विजयराव

भारत सरकारने २०२३ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वीकारले असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे एक सर्वसमावेशक धोरण आहे ज्याचा उद्देश भारतातील शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडवून आणणे हा आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शैक्षणिक धोरण आखण्यास सुरुवात झाली .शैक्षणिक धोरणाविषयी गांभीर्याने विचार मंथन, सुधारणा हे निरंतर काळापासून सुरू आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यापासून ते आता नरेंद्र मोदी यांच्यापर्यंत सर्वांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर विचार केला आहे. नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० पूर्वी डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन आयोग, मुरलीधरन आयोग, राम मूर्ती आयोग ,१९६८ ला कोठारी आयोग इत्यादी आयोग नेमले गेले .१९८६ ला राजीव गांधी सरकारने सुद्धा शैक्षणिक धोरण आणले होते. त्यानंतर १९९२ ला पीव्ही नरसिंहराव यांनी त्याबाबत धोरण आणले यानंतर २००९ ला अर्थमंत्री डॉक्टर मनमोहन सिंग यांनी R T E २००९ आणले .त्यानंतर आता हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे आणले गेले सर्वांनी शैक्षणिक धोरण प्रभावी असले पाहिजे हे प्रयत्न केले असल्याचे आपल्याला जाणवते .नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० ची प्रत्यक्षात अंमलबजावणी २०२३ पासून सुरू करण्यात आलेली आहे.

नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० हे पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकार२०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर तत्कालीन माणूस संसाधन मंत्री स्मृती इराणी यांनी नवीन शैक्षणिक धोरणासाठी पुढाकार घेतला त्याने शिक्षण तज्ञा सोबत सखोल चर्चा करून एकूण ३३ शैक्षणिक मुद्दे काढले हे सर्व मुद्दे समाजासमोर ठेवले गेले म्हणजे वेबसाईटवर टाकण्यात आले. जनतेची मते मागवण्यात आली नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० नवीन शैक्षणिक धोरण तयार होताना हे ३३ मुद्दे जवळजवळ २५ कोटी लोकांनी ९५ हजार गावात ग्रामसभा घेऊन सोबतच देशातल्या ९०० विद्यापीठात ४४ हजार महाविद्यालयातून चर्चासत्रे घडवण्यात आली .नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० यातून हे सर्व मुद्दे एकत्रित गोळा करण्यात आली. त्यानंतर टी एस आर सुब्रमण्यम यांच्या नेतृत्वात या सर्व मुद्द्याचे सार म्हणून २४३ पानाचा मसुदा तयार करण्यात आला. तो पुन्हा वेबसाईटवर टाकण्यात आला .यावर देशभरातून दोन लाख लोकांच्या सूचना प्राप्त झाल्या. नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० त्या दोन लाख सूचनांचा अभ्यास होऊन के क कस्तुरीरंगन यांच्या नेतृत्वात ६५० पाणी एक मसुदा तयार करण्यात आला. त्यानंतर संसदेच्या दोन्हीही सभागृहांमध्ये विचार मंथन होऊन २९ जुलै २०२० रोजी ६६ पाणी धोरण स्वीकारण्यात आले .यात पाच अधिक तीन अधिक तीन अधिक चार ही प्रणाली स्वीकारली आहे. नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० म्हणजे वय वर्ष तीन ते आठ पायाभूत शिक्षणाची अर्थात शिशुगट बालवाडी पूर्व प्राथमिक वर्ग पहिला आणि दुसरा असे एकूण पाच वर्ष असतील या पायाभूत शिक्षणातून दप्तर राहणार नाही. नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० भाषा आणि अंक ज्ञान यावर लक्ष केंद्रित करण्यात येईल त्यानंतर वर्ग

तिसरा ते वर्ग पाचवा हे प्राथमिक शिक्षण राहणार असून या वर्गात मातृभाषेतून शिक्षण दिले जाणार असल्यामुळे विद्यार्थ्यांना आकलनास सोपे जाणार आहे नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० यामध्ये वर्ग सहावी ते आठवी हे माध्यमिक शिक्षणाचे पुढे नववी ते बारावी ही उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय असून बोर्डाचे महत्त्व कमी केलेले आहे तसेच यामध्ये नववी पासून परीक्षा वर्षातून दोनदा सेमिस्टर पद्धतीने यामध्ये होतील या धोरणामध्ये दैनंदिन उपयुक्त ज्ञानावर भर देण्यात आलेला असून नववी ते बारावी मध्ये एकूण २४ विषय असून प्रत्येक सत्रात आपल्या आवडीचे तीन विषय घेण्याची मुभा देण्यात आलेली आहे. या धोरणामध्ये बारावीपर्यंत किमान एक तरी व्यावसायिक कौशल्य विद्यार्थ्यांना प्राप्त होणार आहे. याशिवाय शैक्षणिक संकुल ही अभिनव पद्धत असल्यामुळे परिसरातील शाळा एकमेकांना साहित्य प्रयोगशाळा ग्रंथालय शिक्षक याची देवाणघेवाण करणार आहेत. या पॉलिसी मधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास सहज शक्य होणार आहे .मूल्यमापन पद्धतीत विशेष बदल केलेला असून मूल्यमापन प्रक्रियेत केवळ शिक्षक नसून सह अध्यायी आणि स्वतः विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

उच्च शिक्षणासाठी बहुविध शाळा अभ्यासक्रम पद्धती स्वीकारली असून कला वाणिज्य विज्ञान अशा शाखा राहणार नाहीत. पदवी अभ्यासक्रम चार वर्षाचा असणार आहे. नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० मध्ये महाविद्यालयाचे एक वर्ष पूर्ण केल्यास प्रमाणपत्र दोन वर्ष पूर्ण केल्यास पदविका तीन वर्ष पूर्ण केल्यास पदवी आणि चार वर्ष पूर्ण केल्यास संशोधनासाठी पदवी मिळणार आहे एम. फिल बंद केलेले आहे यामध्ये तर पीएचडीसाठी चार वर्षाची संशोधनासह पदवी प्राप्त करणे आवश्यक असणार आहे पदवी तर शिक्षण चार वर्षाच्या पदवीनंतर केवळ एक वर्षाचे राहील या धोरणांतर्गत शंभरच्या वर विदेशी विद्यापीठे भारतीय विद्यापीठासोबत एकत्रित कार्य करण्यात असल्यामुळे विद्यार्थ्यांना विदेशात जाण्याची गरज भासणार नाही. शाळा महाविद्यालयात पुस्तक मंडळ निर्माण करण्यात येणार असून विज्ञान शाखेसोबत सामाजिक शास्त्राला वित्तीय सहाय्य तरतूद करण्यात आलेली आहे.

विद्यापीठात स्वतंत्र भाषांतर आणि अन्वयार्थ संस्था राहतील त्यामुळे बहुभाषिक प्रोत्साहन राहील राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात कौशल्य तंत्रज्ञान यांचा समावेश आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे एक सर्वसमावेशक धोरण आहे जे भारतातील शिक्षणाच्या भविष्याच्या दृष्टिकोनाची दिशा ठरवत आहे या धोरणाचे अनेक फायदे तोटेही आपल्याला जाणवतील. नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते ज्यामध्ये सामाजिक भावनिक शारीरिक विकास अंतर्भूत होतो हे शैक्षणिक धोरण लवचिक अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना प्रदान करते जे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनिवडी आणि अभिरुशीनुसार विषय निवडण्याची परवानगी देते तसेच बहुविषय शिक्षणास प्रोत्साहन देते यामध्ये विद्यार्थी विविध विषय आणि विविध क्षेत्रांमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात यामध्ये तंत्रज्ञानावर भर दिलेला आहे हे धोरण अध्यापन आणि शिकण्या तंत्रज्ञानाच्या वापराचे समर्थन करते तसेच फ्री स्कूल ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरावर गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सार्वत्रिक प्रवेश सुनिश्चित करण्याचे कार्य करते राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये मल्टिपल एक्झिट

व एन्ट्री हे महत्त्वपूर्ण बदल केलेले आहेत उच्च शिक्षणात पूर्वीच्या शिक्षण व्यवस्थेत जी बंधने होते ती आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात असणार नाही त्यामुळे आपल्या सोयीनुसार उच्च शिक्षण घेणे विद्यार्थ्यांना शक्य होणार आहे यामुळे विद्यार्थ्यांची दर्जेदार उच्च शिक्षण घेण्याची इच्छा व प्रवृत्ती नक्कीच वाढणार आहे असं वाटतं राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्य विकास ही मूळ संकल्पना आहे कौशल्य विकास ही संकल्पना केंद्रबिंदू मानूनच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा विकास करण्यात आलेला आहे. अशा अनेक चांगल्या बाबी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात असल्या तरी अनेक आव्हाने या धोरणासमोर आहेत यांनी ती २०२० हा एक सर्व समावेशक धोरण दस्तावेज आहे ज्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी महत्त्वपूर्ण संसाधने आणि राजकीय इच्छाशक्ती आवश्यक आहे तसेच या धोरणामध्ये किमान पाचवीपर्यत शिक्षणाचे माध्यम म्हणून मात्र भाषा किंवा प्रादेशिक भाषा सुरू करण्याचा प्रस्ताव आहे जे या भाषेची परिचित नाहीत त्या विद्यार्थ्यांसाठी हे आव्हान असणार आहे. तसेच धोरणासाठी पायाभूत सुविधा शिक्षक प्रशिक्षण आणि संशोधनांमध्ये महत्त्वपूर्ण गुंतवणूक आवश्यक आहे जे सरकारसाठी आव्हान ठरू शकते. मुळामध्ये या धोरणाची उद्दिष्ट ग्रामीण आणि शहरी शिक्षणातील दरी कमी करणे आहे. परंतु सहसाधने आणि पायाभूत सुविधा यामधील असमानता लक्षात घेता या ध्येयाची अंमलबजावणी करणे आव्हानात्मक ठरणार आहे.

सारांश एनईपी २०२० हे सर्व समावेशक धोरण आहे ज्याने शिक्षण व्यवस्थेत परिवर्तन घडवण्यासाठी असेच किरण निर्माण केलेले आहेत परंतु काही आव्हाने देखील यामध्ये आहेत या सर्व आव्हानाला दूर करणे हे आजच्या काळाची गरज बनणार नाही आहे.

References:


1) https://www.tarunbharat.net/Encyc/2023/4/4/new-education-policy-2023.html
2) https://www.tarunbharat.net/Encyc/2023/4/4/new-education-policy-2023.html
3) https://www.mahamtb.com/Encyc/2023/4/15/New-Education-Policy.html



**प्रा.डॉ. काशीद सीमा विजयराव**
सहयोगी प्राध्यापक, शिवाजी महाविद्यालय, कन्नड (महा.)